The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत नामदेवांचे उपदेशपर अभंग आणि प्रबोधन

प्रा. डॉ. देशमुख बिभीषण
वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी. ता.जि. धाराशिव.

**प्रस्तावना :-** प्रस्तुत शोधनिबंधातून 'संत नामदेवांचे उपदेशपर अभंग' या अनुषंगाने विवेचन करण्यात आलेले आहे. 'संत नामदेवांचे उपदेशपर अभंग' याचा अभ्यास करणे या उद्देशाने प्रस्तुत निबंधातून शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दृष्टीने मांडणी करण्यात आलेली आहे.

संत नामदेवांचे वाङ्मयीन कार्य महत्वपूर्ण असे आहे. संत नामदेवांचे सुमारे २५०० अभंग प्रसिद्ध आहेत. त्यातील सुमारे बासष्ट अभंग नामदेवजीकी मुखबानी शीख पंथाच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये गुरुमुखी लिपीत आहेत. संत नामदेवांनी आदि, समाधी व तीर्थावळी मधून संत ज्ञानेश्वरांचे चरित्र सांगितले आहे. 'नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग'- अशी त्यांची योग्यता होती. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते.

भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून त्यांनी भागवत धर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे काम त्यांनी केले. नामदेवांनी केवळ अभंगरचना केली नाही, तर भागवत धर्माचा निष्ठेने प्रसार व प्रचार केला. संतमेळा वाढविण्याचे कार्य त्यांनी निष्ठेने केले. त्याचबरोबर 'किर्तन' हा प्रकार सुरु करन भक्ती व धर्माचे महत्व प्रतिपादन केले. वाड्मय संपदा, विचार प्रणाली व सदाचार या तिन्ही बाबतीत वारकरी संप्रदायाने जी अपूर्व देणगी महाराष्ट्राला दिली. त्यामध्ये संत नामदेवाचा योगदान खूप मोठे आहे. भागवत धर्माचे प्रसारक व संवर्धक म्हणून संत नामदेवांची कामगिरी श्रेष्ठ व व्यापक अशा स्वरुपाची आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

1) संत नामदेवांच्या उपदेशपर अभंगाचा अभ्यास करणे.
2) संत नामदेवांच्या उपदेशपर अभंग निर्मितीमागील प्रेरणेचा अभ्यास करणे.
3) समाज प्रबोधन करण्यासाठी त्यांनी काही उपदेशपर रचना केली त्याचे स्वरूप कसे होते याचा अभ्यास करणे.

संत नामदेवांनी समाज प्रबोधन करण्यासाठी काही उपदेशपर रचना केली आहे. तत्कालीन समाज खऱ्या धर्मापासून दूर गेलेला होता. तसेच कर्मकांडाचे प्रस्थ वाढले होते. या कारणामुळे संत नामदेवाणी अभंगरचनेबरोबर कीर्तन परंपरा सुरु करुन, रंजल्या गांजल्या लोकांना मार्ग दाखविला. "नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी" असे नामदेवांनी म्हटलेले आहे. अज्ञानाचा

अंध:कार करून समाजाला प्रकाशमय करणे हे नामदेवांचे कार्य होते. त्याप्रमाणे त्यानी भागवत धर्माचा प्रसार करत असताना व अनेक तीर्थयात्रा करत असतांना त्यांनी समाज प्रबोधन केले आहे. नामदेव साक्षात्कारानंतर जेव्हा लोकसेवेसाठी जगू लागले, जाणिवेचा डोळा उघडून जगाकडे पाहू लागले आणि आपल्या लाभलेल्या श्रेयाचा अनुभव समाजाला देण्यासाठी तळमळू लागले तेव्हा त्या अभंगवाणी बनली. निखळ मनाने केलेला हा उपदेश संसारिकांच्या व दुर्जनाच्याही जीवन मार्गावर प्रकाश टाकू लागला. त्या प्रकाशात त्यांच्या जीवन मार्गाचे खरे स्वरुप, खाच-खळगे आणि काटेकुटेही दिसू लागले. तसेच प्रकाशाची वाट दाखविणारे नामदेवाचे व्यक्तित्वही त्यातून प्रतिबिंबीत होते.

नामदेवांनी आपल्या अभंगातून समाजाला उपदेश केला आहे. या अभंगातूम समाजातील दांभिक प्रवृत्तीवर कडाडून टीका केली.

मुखी नाही नाम । काय जपतो श्रीराम ।
काय आसन घालुन मुखी नाही नारायण
टिळे टोपी माळा दावी भोळ्या भाविकांसी गोवी ।
नामा म्हणे त्याचा संग नको चित्त होय भंगा।

भोळ्या-भाबड्या भाविकांना फसविणाऱ्या ढोंगी साधु वैराग्यांविषयी त्याच्या मनात संताप होता. भक्तीची खरी खूण पटविणारे रामनाम ज्याच्या मुखी सहज आणि सातत्याने येत नाही अशाच्या टिळेटोपीमाळा व्यर्थ असून त्याचा संगही नको असे ते सांगतात. अशा खोट्या दाभिक भक्तिला नामदेवांनी 'काचनीकभक्ती' असे समर्पक नाव दिले आहे. असे जे ढोंगी भक्त असतात ते सतत असंतोषी असतात, स्वतःच्या सुकृताची होळी तो करतो. वेदाध्ययन, पुराणकथा, कर्मकांड, यज्ञयाग, तीर्थाटन हे सर्व व्यर्थ आहे. यामुळे मानवास वैष्णवत्व प्राप्त होत नाही, तर केशवाच्या नामस्मरणाने वैष्णवत्व येते असे ते म्हणतात. "विष्णुशी भजला शिव दुरावला । अध:पात झाला नरा" असे 'शिव- विष्णूमूर्ती एक' असे अद्वैत तत्वज्ञान त्यांनी प्रतिपादन केले आहे. "वेश्या झाली पाटाची राणी।तिला आठवे मागील करणी" किंवा "मांजराचे गेले डोळे ।उंदीर देखोनी तळमळे'' अशा प्रकारे नामदेव दांभिक संन्यासाची उपहासपूर्ण टिका करतात.

हरिदर्शनाला न जाणारा भक्त हा परपुरुषाचे चिंतन करणारी पतिव्रता अथवा पाठीवर घाव घेणार पळकूटा क्षत्रिय असतो. कडू कारले साखरेत घातले तरी कडूच. असा अधम मनुष्य तीर्थाटन करुनही मनाने मलीनच राहतो. जारण-मारण, नागवे फिरने, उग्र तप, उपवास, तीर्थाटन हे सर्व उदंड उपाय व्यर्थ असून विठोबाला शरण जाऊन सर्वकाळ अनंताचे स्मरण

करणे हेच खरे उचित साधन आहे. नामस्मरणात मुख आणि टाळ्या वाजवतांना हात गुंतलेले असताना मन दयेने भरलेले नसेल तर सारे व्यर्थ आहे. असे नामदेवांनी म्हटले आहे.

मनाची विरक्ती ही सोपी गोष्ट नाही. विरक्त झाल्याची कल्पना करुन कित्येकदा मनुष्य स्वतःचीच फसवणूक करीत असतो. "तोवरी रे तोवरी वैराग्याचे ठाण। जव कामिनी कटाक्ष बाण लागले नाही "तर कांडितांची कोडा न निघे तांदुळ शेरा । कैसे फळ अमृताचे" तर 'बुजगावणे शेती माणसे म्हणती। काय त्याचे हाती शस्त्र शोभे। तसेच गोसावीपणाचा दाखविती वेष। नाहीं निदिध्यास हरिनामीं॥ वरी वरी आर्त दाविती झगमग । अंतरीं तो संग विषयाचा ॥ व्यर्थ लोकांपुढें हालविती मान । विटंबन केली संसाराची ॥ अशा रचणेतून नामदेवांनी अशा आत्मसंतुष्ट, ढोंगी साधूचे वाभाडे काढलेले आहेत. बेडूक म्हणजे चिखलाचा भोक्ता। क्षीर सांडूनि रक्ता गोचीड झोंबे। जयाची वासना तथाशीच गोड। प्रेम सुख चाड नाही तया' अशा अत्यंत समर्पक दृष्टातातून वासनेची चटक संत नामदेव वर्णन करतात. शेंदूर, शेरणीची इच्छा करणारी शुद्र देवते मनाचे आर्त काय पुरविणार, असा सवाल नामदेव करतात.

नामदेव विधायक उपदेश करतात. वासनेची शांती करून अनंताला शरण जाणे, शरीर संपत्तीचा अभिमान सोडून मन कृष्णाच्या पायी लीन करावे, परदारा, परनिंदा-परपीडा यांच्या नादी न लागता देवाचे भजन करावे. सर्वांभूती कृपा ठेवून संतांची संगती राखली म्हणजे जन्ममरणाची पुनरावृत्ती होणार नाही. असा नामदेवांना वाटते. दुर्लभ नरजन्म देवयोगे लागला असता त्याचा उपयोग ध्याय, स्थितप्रज्ञता अंगी बाणवून स्वतःलाही पावन करावे असे ते उपदेश करतात. हरिनामाच्या बाबतीत उदासिन असणारा माणूस पतित व निष्ठूर असतो. सूर्य हे आयुष्य सरण्याचे माप असते. गाईच्या स्तनात दूध भरलेले असतांनाही तिचे रक्त सेवन करनाऱ्या क्षूद्र गोचिडाप्रमाणे संसारपन विषयलोलूप बापयाना परब्रम्हाची गोडी नाही, अशा विविध उपमा-दृष्टांतातून नामदेवांनी परिणामकारक बोध केलेला आहे.

नामदेव सर्वसामान्य माणसांकडून अपेक्षा व्यक्त करतात. संसारी माणसाने विठ्ठलाच्या भेटीची आस बाळगावी अशी नामदेवांचे मत जाहे. जन्मा येऊनियां काय पुण्य केलें । बाळपण गेलें वांयांविण॥ संतसंगें सुख हुंडारलें जाणा । नामसंकीर्तना ओळखतभक्तीविणें जिणें जळो लजिरवाणें । संसार भोगणें दुःखरूप॥ असे ते म्हणतात. "सोयरा निर्वाणी पांडुरग" हे सांसरिकांनी खरेपणाने समजून घेतले पाहिजे. हे सारे उद्गार नामदेवांच्या अंतरीच्या कळवळ्यातून आलेले आहेत. व्यापारी असावे, पण लक्ष सतत ईश्वरी ठेवावे. असे नामदेव असा उपदेश करतात. दुरीच्या दुरी अंबरी उडणारी पावडी, दुडीवर दुडी ठेवून पाण्या निघालेली युवती इ. मनोहर दृष्टांत नामदेव देतात. भक्तीविण मोक्ष नाही असे सांगून नामदेव मोक्ष प्राप्तीमधील भक्तीचे महत्व पटवून देतात. विठोबास डोळे भरुन पाहिले की, मग त्याचा विसर

पडणे अशक्य आहे. तसेच केशवाचा ठसा हृदयात मांडून सर्वांनी निश्चित व्हावे ही त्यांची खरी इच्छा आहे. कारण प्रत्यक्ष देवरूप बनविण्याचे सामर्थ्य भक्तीमध्ये आहे. अशी त्यांची श्रध्दा आहे. गुळ जसा गोड म्हणावा लागत नाही, त्याची गोडी चाखणाऱ्यालाच बरोबर समजते, तसाच देव जानावा लागत नाही. भक्तीचा छंद जीवाला लावण्यासाठी अगदी सोपा उपाय ते सांगातात. एका हातात टाळ घेऊन आणि दुसऱ्या हातात दिंडी घेऊन मुखाने अविरत रामनामाचा उच्चार करीत, वेडेवाकडे नृत्य करीत राहणारा हा भक्त स्वतःच भक्तीत रंगाला त्याला ऋषीकेशाचा प्रतिसादही तसाच उत्कटतेने मिळतो. आपल्या प्रेमाचे सुख घेण्यासाठी तोच सर्वांना आपणहून आग्रह करतो. प्रेमसुख प्राप्तीसाठी खऱ्या भक्तीवाचून अन्य काहीच साधन लागणार नाहीत.असा नामदेवाचा आग्रह आहे.

भक्तीची श्रेष्ठता नामदेवांनी ज्ञानापेक्षाही जास्त असल्याचे सांगितले आहे. भक्तीविण मोक्ष नाहीं हा सिद्धांत 'वेद बोले हात उभारोनि ॥ तरी तेंचि ज्ञान जाणाया लागुनि । संता वोळगोनि वश्य किजे ॥ प्रपंच हा खोटा शास्त्रें निवडिला । पाहिजे साक्षिला सद्‌गुरु तो॥ नामा म्हणे सेवा घडावी संतांची । घ्यावी कृपा त्याची तेंचि ज्ञान॥ ज्याच्या मनात भक्ती नाही, त्याच्या पांडित्याचा नामदेव तिरस्कार करतात. पंढरीच्या वारीचे भक्तीसुख सोडून मोक्षाचे मागणे मागण्याऱ्यालाही ते भिकारी असे म्हणतात. पंढरीला जावे आणि विठ्ठलाला भेटून जीवनमुक्त व्हावे, ही इतिकर्तव्यता असते. विठ्ठलाच्या चरणी काया, वाचा मनाने समर्पण व्हावे, मग अंतर्बाह्य एक कैवल्यच अनुभवास येते. म्हणून नामदेव विठ्ठलाच्या भेटीला जाण्यासाठी विनवणी करतात.

नामदेवांनी आपल्या मनालाही परमार्थबोध केलेला आहे. हरिकीर्तनाला लाजणाऱ्या मनाला भक्तिप्रवण बनवितांना 'तू होय मागता हरि होय दाता' असे ते म्हणतात. नामदेवानी आपल्या मनालाही प्रतीकरूप परमार्थबोध केलेला आहे. 'नको नको मना हिंडो दारोदारी' असे आवहनही उत्कटपने केले आहे. सतसंगाची महती मनाला प्रभावीपणे पटविण्यासाठी 'शेवटील घडी' चे भान त्यांना आहे. वासनेची शांती करून अनंताला शरण जावे, शरीरसंपत्तीचा अभिमान सोडून मन कृष्णापाशी लीन करावे, परदारा, परनिंदा परपीडन यांच्या नादी न लागता देवाचे भजन करावे असा विधायक उपदेश नामदेवांनी केला आहे. सर्वांभूती कृपा ठेवून संतांची संगत ठेवली म्हणजे जन्ममरणाची पुनरावृत्ती होणार नाही, असा त्यांचा विश्वास आहे.

नामदेव नामाचे महत्व सांगतांना म्हणतात हरिनामाच्या बाबतीत उदासी असणारा माणूस पतित असून त्याला यम-कींकर त्रास देतील, तर नामावर विश्वास ठेवणाऱ्याला गर्भवास भोगावा लागणार नाही. उंदारावर जसे मांजर टपून बसलेले असते तसा काळ सुखलोलुप

जीवावर टपून बसलेला असतो. रोज उगवून मावळणारा सूर्य हे आयुष्य सरण्याचे माप असते. गाईच्या स्तनात दूध भरलेले असतानाही तिचे रक्त सेवन करण्यात जन्म घालवणाऱ्या क्षुद्र गोचिडाप्रमाणे संसारमग्न विषयलोलुप बापड्यांना परब्रम्हाची गोडीही कळतच नाही. अशा विविध उपदेशपर रचनातून नामदेवांनी अत्यंत परिणामकारक रूपात बोध केलेला आहे

थोडक्यात असे म्हणता येते की, समाजाला जागृत करण्यासाठी नामदेवांनी अनेक उपमा दृष्टांत देऊन उपदेश केला आहे. खरा धर्म व खरी भक्ती यांचे मर्म पटवून दिले आहे. नामदेवांची उपदेशपर रचना अल्प असली तरी लक्षणीय अशी आहे.

**निष्कर्ष**

१ नामदेवांनी आपल्या अभंगवाणीतील अभंगातून समाजाला उपदेश केला आहे.

२ विविध उपमा-दृष्टांतातून नामदेवांनी परिणामकारक बोध केलेला आहे.

३ भक्तीविण मोक्ष नाही असे सांगून नामदेव मोक्ष प्राप्तीमधील भक्तीचे महत्व पटवून देतात.

४ नामदेवांनी मनालाही परमार्थबोध केलेला आहे.

५ विविध उपदेशपर अभंग रचनातून नामदेवांनी अत्यंत परिणामकारक रूपात बोध केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१ डॉ. मु. श्री. कानडे : 'संत साहित्य : संदर्भ कोश' स्नेवर्धन प्रकाशन पुणे, १९९५.
२ आजगावकर,ज.र.: 'श्री. नामदेवमहाराज आणि त्यांचे समकालीन संत', मुंबई, १९२७.
३ ढेरे, रा. चिं. संपा. : 'संतांच्या आत्मकथा', पुणे, १९६७.
४. ढेरे, रा. चिं. संपा. : 'संतांच्या चरित्रकथा', पुणे, १९६७.
५. तुळपुळे, शं. गो. : 'पांच संतकवी',पुणे, १९४८.
६. भावे, वि. ल. : 'महाराष्ट्र-सारस्वत', मुंबई, १९६३.
७. महाराष्ट्र शासन, : श्री. नामदेवचरित्र,काव्य आणि कार्य', मुंबई, १९७०.
८. मुळे, मा. आ. : 'श्री. नामदेवचरित्र', पुणे, १८९२,पुनर्मुद्रण १९५२.